# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१
Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/संकिर्ण/पदभ/२०२२/**१२२३** दि.०६-०५-२०२२

प्रति, **अत्यंत महत्वाचे (पदभरती)**

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.१.१०.२०१७ अखेरचा शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आढावा...

संदर्भ:- १) शासन पत्र क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/मशि.५, दि.०४-०५-२०२२.
२) मा.संचालनालयाकडील पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/४८०५, दि.०५-०५-२०२२.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र.आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/मशि-५, दि.१२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये एकूण २०८८ शिक्षकीय पदांच्या पदभरतीस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचा दि.२५-१-२०२२ च्या अधिनियमान्वये आरक्षण धोरणामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार उच्च शिक्षण विभागाकडून दि.०७-०४-२०२२ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली तसेच दि.११-०४-२०२२ च्या शासन निर्णयानुसार आरक्षण धोरणाचा अवलंब कसा करावा याबाबतचे मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

याबाबत मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दि.०४-०५-२०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. दि.१५-०५-२०२२ पर्यंत सर्व महाविद्यालयांनी संबंधीत प्राधिकरणांकडून बिंदूनामावली निश्चित करुन घेण्यात यावी व नाहरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा अशा सूचना मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिलेल्या आहेत. तसेच दि.१५-०५-२०२२ पर्यंत ज्या महाविद्यालयांनी बिंदूनामावली निश्चित केलेली नाही, अशा महाविद्यालयांची पदे इतर महाविद्यालयांकडे हस्तांतरीत करण्यात येतील.

विषयांकीत प्रकरणी उपरोक्त सूचनांप्रमाणे विहीत कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याच्या अनुषंगाने उक्त सूचना आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत ओहत.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:-
१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.